आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
रविवार दिनांक ०९ मार्च २०२५

ठळक बातम्या

1. पतंजली फूड आणि हर्बल पार्कसाठी दररोज ८०० टन संत्र्यावर प्रक्रिया होणार; विदर्भात संत्र्याचे एकरी उत्पादन वाढण्याची आवश्यकता असल्याचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे प्रतिपादन.
2. राज्याचा आगामी आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प उद्या विधीमंडळात सादर होणार.
3. २०३० पर्यंत राज्यात ५२ टक्के अपारंपरिक स्त्रोतांपासून ऊर्जा निर्मिती - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती.
4. आयसीसी चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात न्यूझीलंडचं भारतापुढं जिंकण्यासाठी २५२ धावांच उद्दिष्ट.

पतंजली फुड आणि हर्बल पार्क

पतंजलीच्या नागपुरातील मिहान स्थित फुड आणि हर्बल प्रकल्पासाठी दिवसाला जवळपास ८०० टन संत्र्यांची आवश्यकता लागणार आहे. त्यामुळे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या मालाला आपसुकच बाजारपेठ उपलब्ध होणार आहे. तसेच या प्रकल्पामुळे स्थानिकांना रोजगारही उपलब्ध होणार असल्याचे मत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज नागपुरात मिहान परिसरातील पतंजली फुड आणि हर्बल पार्कच्या उद्घाटन प्रसंगी व्यक्त केले.

*रामदेव जी आपको लगने वाला संतरा हम बड़े प्रमाण पर उपलब्ध करा कर देंगे। ये विश्वास मैं आपको देना चाहता हूँ। संतरे के ग्रेडिंग करने वाले करीब आठ दस कारखाने शुरू हुए हैं। मुझे बताते हुए खुशी हो रही है कि महाराष्ट्र सरकार ने जो संतरे का एक पैकेजिंग सॉर्टिंग करने का यूनिट तैयार किया था, वो बंद पड़ा था, देवेंद्र जी ने मेरे रिक्वेस्ट पर श्रीधरराव ठाकरे जो है आष्टी के उनकी एक समिति बनाकर उनको चलाने के लिए दिया है।*

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, योगगुरु स्वामी रामदेव बाबा, पतंजली आयुर्वेद लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक आचार्य बाळकृष्ण, कृषी राज्यमंत्री **ॲ**ड. आशिष जयस्वाल, आमदार डॉ. आशिष देशमुख, समीर मेघे आदी यावेळी उपस्थित होते. तत्पूर्वी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री गडकरी यांच्या हस्ते पतंजली फुड आणि हर्बल पार्कच्या कोनशिलेचे अनावरण आणि प्रकल्पाचे विधीवत उद्घाटन करण्यात

आले. पतंजली फुड आणि हर्बल पार्कच्या माध्यमातून संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या मालावर प्रक्रिया करून तो बाजारपेठेत जाणार आहे. संत्र्याची ग्रेडींग, साठवणही येथे होणार असून हा प्रकल्प संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी बोलताना केले.

*कई राज्यों की सरकारों उनको मुफ्त में जमीन दे रही थी और बुला रही थी, लेकिन मैंने और आदरणीय गडकरी जी ने उनको निवेदन करने के बाद, बाबाजी ने कहा चाहे जो हो जाए मैं विदर्भ में ही आऊंगा, मैं नागपुर में ही आऊंगा। बाबा जी को जमीन मुफ्त में नहीं दी गई, सीधी आवंटित भी नहीं की गई। हमारे यहाँ तो पारदर्शिता है, हम तो टेंडर बुलाएंगे और जो जमीन का सबसे ज्यादा भाव देगा उसको जमीन देंगे। तीन बार हमने टेंडर निकाला, तीनो बार एक ही टेंडर आया पतंजलि का और किसी ने हिम्मत ही नहीं की।*

या प्रकल्पास राज्य शासन सर्वतोपरी सहकार्य करणार असून पतंजली आणि राज्यशासन संयुक्तपणे सर्व सोयींनी सज्ज नर्सरी उभारणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

अर्थसंकल्प

राज्याचा आगामी आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प उद्या विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांमध्ये सादर होणार आहे. महायुती सरकार पुन्हा सत्तेत आल्यानंतरचा हा पहिलाच अर्थसंकल्प अर्थमंत्री अजित पवार आधी विधानसभेत आणि त्यानंतर विधानपरिषदेत सादर करतील. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची रक्कम वाढवण्यासह काही महत्त्वाच्या घोषणा या अर्थसंकल्पात होण्याची अपेक्षा आहे.

जनसंपर्क

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या प्रयत्नांमुळे काम झाल्यानंतर नागरिकांनी आज त्यांच्याप्रति कृतज्ञता व्यक्त केली. आज नागपुरातील खामला स्थित जनसंपर्क कार्यालयामध्ये आयोजित जनसंपर्क कार्यक्रमात अनेकांनी त्यांचे आभार मानले. गडकरी यांच्या सहकार्याने हृदयशस्त्रक्रिया झालेल्या रुग्णांनीही गडकरी यांची भेट घेऊन गडकरी यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. यामध्ये काहींवर शस्त्रक्रिया झालेल्या आहेत, तर काहींच्या अँजिओप्लास्टी झाल्या आहेत. विविध मागण्यांची निवेदने स्वीकारून गडकरी यांनी संबंधित विभागांकडे या संदर्भात पाठपुरावा करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले. यासोबतच रेल्वे, महामार्ग,

कृषी, सहकार, पर्यावरण, पाणीपुरवठा, ऑटोमोबाईल अशा विविध क्षेत्र आणि विभागांशी संबंधित विषय गडकरी यांनी ऐकून घेतले.

<u>सौर ऊर्जा</u>

भारतीय व्यवस्थापन संस्था (आयआयएम) नागपूरमध्ये सौर ऊर्जा प्रकल्पाद्वारे या संस्थेसाठी लागणारी ऊर्जा निर्मितीची गरज पूर्ण होऊन संस्थेची नेट झिरो उद्दिष्टाकडे वाटचाल होणार असल्याचे प्रतिपादन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केले. वर्ष २०३० पर्यंत राज्यात एकूण ऊर्जा निर्मितीपैकी ५२ टक्के ऊर्जा अपारंपरिक स्त्रोतांपासून निर्माण करण्याचे उद्दिष्ट पूर्ण करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले. नागपूरच्या मिहान परिसरात स्थित आयआयएममध्ये मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते २ मेगावॅट क्षमतेच्या सौर प्रकल्पाचे भूमिपूजन आणि कोनशिलेचे अनावरण झाले, यावेळी ते बोलत होते. कृषी राज्यमंत्री **ॲ**ड. आशिष जयस्वाल, आमदार डॉ.आशिष देखमुख, राज्य शासनाच्या विद्युत पारेषण कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक डॉ.संजीव कुमार, आयआयएमचे संचालक डॉ.भिमराय मैत्री आदी यावेळी उपस्थित होते. राज्य शासनानेही ऊर्जा संक्रमणाचे उद्दिष्ट गाठण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरु केले आहेत. राज्य शासन अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांपासून ऊर्जा निर्मितीला प्रोत्साहन देत आहे. वर्ष २०३० पर्यंत राज्यात ५२ टक्के ऊर्जा निर्मिती ही अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांच्या माध्यमातून करण्याचे उद्दिष्ट आहे आणि ते पूर्ण करण्यात येईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

<u>चँपियन्स करंडक क्रिकेट</u>

चँपियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत आज दुबई इथं भारत आणि न्यूझीलंड यांच्यात विजेतेपदासाठी सामना होत आहे. न्यूझिलंडनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतलेल्या न्यूझीलंडन निर्धारित ५० षटकात ७ गडी बाद २५१ धावा करीत भारतापुढं जिंकण्यासाठी २५२ धावांच उद्दिष्ट ठेवलं आहे. याआधी न्यूझिलंडविरुद्धच्या सामन्यात भारतानं ४४ धावांनी विजय मिळवला होता. मात्र न्यूझीलंडने इतर सर्व सामने जिंकले. या स्पर्धेत भारतीय संघाने आतापर्यंत एकही सामना गमावलेला नाही.

<u>कृषि कीर्तन</u>

यवतमाळमध्ये आयोजित जिल्हास्तरीय कृषि महोत्सव आणि प्रदर्शनीत शेतकऱ्यांना कृषि कीर्तनाच्या माध्यमातून कापूस आणि इतर पिकांची लागवड, तंत्रज्ञान तसेच कृषिविषयक माहिती देण्यात आली. केंद्रीय कापूस संशोधन संस्था नागपूरचे डॉ. बाबासाहेब फंड यांनी हा किर्तनाचा प्रबोधनपर कार्यक्रम सादर केला. आपल्या किर्तनाच्या माध्यमातून त्यांनी कपाशी आणि इतर पिकाची लागवड तंत्रज्ञान, बि-बियाणे निवड, पेरणीची पध्दत,

एकात्मिक किड व्यवस्थापन, एकात्मिक रोग व्यवस्थापन, रासायनिक किड नाशकाची फवारणी करतांना घ्यावयाची काळजी, काढणी, काढणी पश्चात तंत्रज्ञान इत्यादी बाबींची माहिती दिली.

ई-ऑफिस' प्रणाली

शासनाच्या 'ई-ऑफिस प्रणाली वापराच्या उपक्रमात गेल्या सात महिन्यांच्या कालावधीत ५१ हजार २३१ 'ई-ऑफिस फाइल्स' तयार करून अकोला जिल्हा परिषद 'ई-ऑफिस' प्रणालीत राज्यात अव्वल ठरली आहे. शासनाच्या 'ई-ऑफिस' संकेतस्थळावर ७ मार्च रोजी अवलोकन केले असता, 'ई-ऑफिस' प्रणालीद्वारे कामकाज करण्याच्या कामात अकोला जिल्हा परिषद राज्यात प्रथम क्रमांकावर असल्याचे नोंदविण्यात आले आहे. गेल्या ऑगस्टपासून अकोला जिल्हा परिषद प्रशासनामार्फत 'ई-ऑफिस' प्रणालीमध्ये कामकाज सुरू करण्यात आले आहे. जिल्हा परिषद मुख्यालयातील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी ई-ऑफिस' प्रणालीत नोंदणी केल्यानंतर कामकाज करत असून, जिल्ह्यातील सात पंचायत समित्यांमधील १४८ कर्मचाऱ्यांनीही 'ई-ऑफिस' प्रणालीत कामकाज सुरू केले आहे.

गोवंशीय जनावरे

भंडारा जिल्ह्याच्या लाखनी येथील पोलीस कर्मचारी राष्ट्रीय महामार्ग क्र. ५३ वर पेट्रोलींग करीत असताना एक बोलेरो पिकअप चारचाकी वाहनात जनावर वाहतुक करीत असल्याचे आढळून आल्याने वाहन चालक श्रीकांत तुळशीराम नगरकर याच्या ताब्यातील बोलेरो पिकअप चारचाकी वाहनाची पाहणी केली. यावेळी त्यात टॅगींग नसलेले १३ गोवंशीय जनावरे कोंबून कृरतेची वागणूक देऊन कत्तलखान्यात नेण्याचे हेतूने अवैधरित्या आढळून आले. पोलिसांनी 13 जनावरांची सुटका करत गाडीसह चालकाला अटक केली आहे.

प्रशिक्षण

वनहक्क कायदा -2006 अंतर्गत सामुहिक दावे मंजूर झालेल्या चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील क्रियाशील वनहक्क समिती सदस्याना ‘सामुहिक वनहक्क उपजीविकेसाठी बांबूचा वापर आणि सी.एफ.आर. भागात ग्रामपंचायतीच्या जबाबदाऱ्या’ या विषयावर तीन दिवसीय प्रशिक्षण बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र चिचपल्ली यांच्यातर्फे वन अकादमी येथे आयोजित करण्यात आले आहे. अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण) तथा वन अकादमीचे संचालक एम. एस. रेड्डी यांच्या संकल्पनेतून हे प्रशिक्षण 10 टप्प्यात आयोजित केले आहे. ज्यातून चंद्रपूर व गडचिरोली मधील विविध क्रियाशील वनहक्क

समितीच्या 300 सदस्यांना या प्रशिक्षणाचा लाभ देण्यात येणार आहे. सदर प्रशिक्षणाचे एकूण तीन टप्पे पूर्ण झाले असून चौथा टप्पा नुकताच वन अकादमीमध्ये पार पडला.

<u>हवामान</u>

हवामान! आज विदर्भात सर्वात जास्त तापमानातून अकोला येथे 39 अंश सेल्सिअस करण्यात आली आहे तर किमान तापमानाची नोंद गडचिरोली येथे पंधरा पूर्णांक 4 अंश सेल्सिअस  करण्यात आली आहे नागपूरचे कमाल तापमान 38 तर किमान तापमान 18 पूर्णांक 2 अंश सेल्सिअस होते.

*****